॥ हे राष्ट्र देवतांचे ॥

गायिकाः राणी वर्मा आणि कोरस
गीतः ग. दि. माडगूळकर
संगीतः सी. रामचंद्र
चित्रपटः घरकुल

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे ॥ धृ. ॥

कर्तव्यदक्ष भूमि, सीता रघुत्तमाची
रामायणें घडावी जेथे पराक्रमाची।
शिर उंच उंच व्हावे हिमवंत पर्वताचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे ॥ १ ॥

येथे नसो निराशा थोड्या पराभवाने
पार्थास बोध केला येथेच माधवाने।
हा देश स्तन्य त्याला धनसाध्य अमृताचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे ॥ २ ॥

येथे परंपरांचा सन्मान नित्य आहे
जनशासनात एका पायाच सत्य आहे।
येथे सदा निनादो जनगीत जागृताचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे ॥ ३ ॥